

कर्नाटक सरकार

परिसर अध्ययन

ENVIRONMENTAL STUDIES

अभ्याससहित पाठ्यपुस्तक

TEXT CUM WORK BOOK

(REVISED)

Part-2

मराठी माध्यम

MARATHI MEDIUM



इयत्ता पहिली

FIRST STANDARD

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)

6th Cross, Malleshwaram,
Bengaluru - 560 003.

अनुक्रमणिका

G5E6Z2

पाठ क्रमांक	पाठाचे नाव	पृष्ठ क्रमांक
8.	सुरक्षितता आणि शिस्त	1-4
9.	वाहतुकीची साधने	5-11
10.	मी आणि माझे कुटुंब	12-21
11.	शेजारी	22-24
12.	चला खेळ खेळूया	25-32
13.	आम्हाला हे पाहिजे	33-40
14.	आकाशातील मित्र	41-48
15.	आपल्या सभोवताली	49-54

पाठ 8


सुरक्षितता आणि शिस्त

H2A3E8

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- वैयक्तिक सुरक्षितता जाणून घेशील.
- रांगेत उभे राहशील.
- गरजा पुरविणाऱ्या सोयी ओळखशील.

चित्रांचे निरीक्षण कर.














उत्तरे सांग.

- यांना काही दुखापत झाली का? कशामुळे?
- तू असं कधी केलंस का?
- तुला कधी दुखापत झाली का?

मोठी माणसे काम करताना निरीक्षण कर. अनुकरण कर. मोठी माणसे व गुरुजन सांगतील त्याप्रमाणे वाग. तू सुरक्षित राहशील.

खालील चित्राचे निरीक्षण कर.

तुला चित्रात काय दिसते? सांग.



या चित्रापासून तू काय शिकलास?


खालील चित्रापैकी बरोबर चित्रासमोर (✓) अशी व चूक चित्रासमोर (✗) अशी खूण कर.



बरोबर (✓) आणि चूक (✗) चे कारण सांग.

खाली दिलेली वाक्ये वाच. बरोबर वाक्यासमोर (✓) अशी व चूक वाक्यासमोर (✗) अशी खूण कर.

1. रांगेत उभे राहणे म्हणजे वेळ वाया घालवणे. ☐
2. रांगेत थांबून पाळीने गेल्यास सर्वांना पाणी मिळते. ☐
3. रांगेत थांबल्यास सर्वांना त्रास होत नाही. ☐
4. बस मध्ये चढताना रांगेत थांबणे चांगले. ☐



- रस्त्यावरील दिव्यांची गरज काय?
- आम्हाला शाळा कशाला पाहिजे?
- बसथांब्याचा आम्हाला काय उपयोग होतो?
- तू दवाखान्याला का जातोस?

या सर्व आम्हाला आवश्यक सोयी आहेत. तुमच्या गावात असलेल्या सोयी सांग. या सोयींचा गावातील लोक कसा उपयोग करतात? निरीक्षण कर.

पाठ 9


वाहतुकीची साधने

B2N8T2

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

*स्थानिक वाहतूकीच्या साधनांची माहिती मिळवशील.

खाली दिलेल्या चित्रातील वाहनांची नावे सांग.



तुझ्या गावात असणाऱ्या वाहनासमोर (✓) अशी खूण कर.

तू कोणकोणत्या वाहनातून प्रवास केला आहेस? त्यांची नावे सांग.


खालील वाहनांची चित्रे बघ. तुला आवडणारे वाहन कोणते? का?





खेळ खेळा.


* या वाहनांच्याप्रमाणे आवाज काढून चल.
  रेल्वे, सायकल, स्कूटर, बस.
* तुझ्या मित्रमैत्रिणीबरोबर 'झुक झुक गाडी' खेळ खेळा.
* कागदाची नाव करुन पाण्यावर तरंगत सोड.


कागदाची नाव करण्यास शिक.

















ही चित्रे रंगव.





ही वाहने कोठे चालवतात? रेषेने जोड.

















गा आणि आनंद लुटा

बसचा हॉर्न वाजतो पीप, पीप, पीप
विमानाचे पंखा फिरतो सुंई, सुंई, सुंई
सायकलची घंटा वाजते ट्रिंग, ट्रिंग, ट्रिंग
बैलाची घंटा वाजते किण, किण, किण

रेल्वेचे इंजिन बोले झूक, झूक, झूक
होड्यांची रांग चाले छक् छक् छक्
रिक्षाचा आवाज येई पोंम, पोंम, पोंम
स्कूटरची चाके फिरती झूम, झूम, झूम

रस्तावरुन धावतात विविध वाहने
समजून घे तू सर्व वाहने
सर्वत्र चालतात तऱ्हे तऱ्हेची वाहने
आम्हा सर्वांना फिरण्यास पाहिजेत वाहने





पाठ 10


मी आणि माझे कुटुंब

V4T4J1

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,



- कुटुंबातील सदस्यांचे नाते (संबंध) समजून घेशील.
- घरकामात एकमेकांना मदत करण्यास शिकशील.
- कुटुंब आणि परिसरातील नातेवाईकांना ओळखशील.

चित्र बघ.




हे सुनिलच्या कुटुंबाचे चित्र. या चित्रात कोणकोण आहेत? सांग.

तुझ्या घरात यापैकी कोणकोण आहेत? त्या समोरील चौकोनात (✓) अशी खूण कर.







तुझ्या घरात आणखी कोणकोण आहेत? सांग.

या चित्रामध्ये कोणकोण आहेत? ओळखून सांग.





गा आणि आनंद लुटा

आई, बाबा, ताई, भाऊ
सारेजण मिळून राहू
मिळूनी सारे काम करु
आनंदाने गाणे गाऊ

बाबांचे बाबा माझे आजोबा
आईचे बाबाही माझे आजोबा
बाबांची आई माझी आजी
आईची आईही माझी आजी

उत्तर सांग :


* आईची आई तुझी कोण?
* वडिलांची आई तुझी कोण?
* आईचे वडील तुझे कोण?
* वडिलांचे वडील तुझे कोण?

खालील चित्रे बघ. तुला या कामासाठी कोण मदत करते? ते सांग.













खालील चित्रांचे निरीक्षण कर. तुला या कामासाठी कोण मदत करत ? संबंधीत चित्रे रेषेने जोड.















खालील चित्रे बघ. या चित्रात कोणती कामे करत आहेत? कोण कोणाला मदत करत आहे ? सांग.







खालील चित्रे बघ. तू घरात कोण कोणत्या कामात मदत करतोस ? चौकोनात (✓) अशी खूण कर.











खालील चित्रे बघ. तू करत असलेल्या कामाच्या चित्रांना रेषेने जोड. उदाहरण दिलेले आहे.















तू शाळेत करत असलेल्या कामासाठी (✓) अशी खूण कर.





तू शाळेत कोणाबरोबर जेवण करतोस ?



तुझ्या घराजवळ राहणाऱ्या मित्राचे / मैत्रिणीचे नाव सांग.

गा आणि आनंद लुटा

सखे सोबती आपण सारे
मिळूनी गाणे गाऊ सारे

शाळेमध्ये मिळून जाऊ,
सारे मिळूनी काम करु.

अभ्यास आम्ही करुया,
नाचूया नि खेळूया.
प्रेमाने आम्ही राहूया,
आनंदाने राहूया.



पाठ 11


शेजारी

V6W6X7

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* घरी व शेजारी करत असलेली कामे समजून घेशील.
* शेजाऱ्यांशी असणारे सहकार्य जाणून घेशील.

तुला घरात करत असलेली कामे माहीत आहेत. आता ही चित्रे बघ. खालील प्रश्नांची उत्तरे दे.



घरासमोर काय आहे?



तेथे काय चालले आहे?



नळासभोवतीची जागा कशी आहे?




दोघे काय करत आहेत?







रमाने सर्वांना का बोलविले? | सारे काय करत आहेत?


रवि का रडत आहे? | रवि रडायच का थांबला?



* तू शेजाऱ्यांबरोबर खेळतोस त्या खेळांची नावे सांग.
* तू शेजाऱ्यांबरोबर कोणती गाणी गातोस ती सांग.

तुम्ही व शेजारी मिळून करत असलेल्या कामांना (✓) अशी खूण कर.




तुम्ही व शेजारी मिळून करत असलेली इतर कामे सांग.

पाठ 12

चला खेळ खेळूया


D3W1D9

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

*विविध खेळांची नावे सांगशील.


खालील चित्रांचे निरीक्षण कर. तू खेळत असलेल्या खेळासमोर (✓) अशी खूण कर.






येथे काही खेळांची चित्रे दिलेली आहेत. त्यांची नावे सांग.


























खालील चित्रात खेळाच्या वस्तू दिलेल्या आहेत. त्या वस्तूंचा कोणत्या खेळात वापर करतात? सांग.
















येथे लहान व मोठा चेंडू वापरून खेळावयाचे खेळ दाखविले आहेत.












तू हे चेंडू वापरुन खेळावयाच्या इतर खेळांची नावे सांग.







गा आणि आनंद लुटा

आठवडयाचे सात वार
सुट्टीचा तो रविवार
सोमवारी खेळू व्हॉलीबॉल
मंगळवारी खेळू फूटबॉल
कब्बडी खेळू बुधवारी
खो खो खेळू गुरुवारी
शुक्रवारी खेळू क्रिकेट चेंडू
शनिवारी खेळू विटी दांडू
आठवड्याचे वार सात
खेळासाठी नाही पुरत.

खालील चित्र रंगव.







पाठ 13

आम्हाला हे पाहिजे


E4P6I5

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

*मुलभूत गरजा ओळखून त्यांची यादी करशील.


चित्रातील मुले काय करीत आहेत? सांग.















येथे काही वस्तू चित्रात दाखविल्या आहेत. तुला पाहिजे असलेल्या वस्तूंना रेषेने जोड.






















मला भूक लागली आहे.
आपण जेवण करुया का?




मल तहान लागली आहे.
आहा! तहान लागल्यास
मला पिण्यास पाणी पाहिजे.



पाऊस सुरु झाला. चला
घरी जाऊया.




हवा, थंडी, वारा, पाऊस
ऊन यापासून शरीराचे
रक्षण करण्यास
मला कपडे पाहिजे.




मला श्वसनासाठी
हवा पाहिजे.
नाही का?



आपणा सर्वांना पाणी, आहार, हवा, कपडे,
घर हवेच. या आमच्या मूलभूत गरजा आहेत.















प्राण्यांना हवा, पाणी व आहार पाहिजे.





वनस्पतींनासुध्दा हवा, पाणी व आहार पाहिजे.

चौकोनात असलेल्या रेषाप्रमाणे बाजूला असलेल्या रिकाम्या चौकोनात चित्र काढ व रंग भर.











चित्रे बघ. योग्य चित्रासमोर (✓) अशी खूण कर.


मला पिण्यासाठी पाणी






मला खाण्यासाठी फळे





मला राहण्यासाठी घर





मी वापरत असलेले कपडे





पाठ 14


आकाशातील मित्र

J2Z3V5

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,
*सूर्य, चंद्र, तारे ओळखशील.

तू आकाशाचे निरीक्षण केलस का? आकाशात काय काय दिसते?

खालील चित्रापैकी आकाशात दिसणाऱ्या चित्रासमोर चौकोनात (✓) अशी खूण कर.



दिवसा तुला आकाशात काय काय दिसते? समजून घे. रात्री निरभ्र आकाशात काय काय दिसते. मित्र मैत्रिणींना सांग.

चित्र पाहून सांग.

आता दिवस आहे. आकाशात तुला काय काय दिसते ?




सूर्य मावळल्यावर काय होते ? सांग.

रात्री आकाशात काय काय दिसते?



तारे फार दूर असल्याकारणाने ठिपक्या सारखे दिसतात.

रेषा ओढून जोड.



चंद्र



तारे




सूर्य

मित्र मैत्रिणींबरोबर खेळ.

- वर्गखोलीत एक गोल काढा. चित्रात दाखविल्याप्रमाणे सूर्य, चंद्र व तारे काढा.
- सर्वजण गोलाकार उभे राहून गोल फिरा.
- एकाला शिटी मारण्यास सांगा. शिटी वाजवण्याची बंद होताच जागेवर थांबा. थांबलेल्या जागेवर असलेल्या आकाशातील मित्राचे नाव एकेकाने



गा आणि आनंद लुटा




लुकलुकत्या चांदणी आहेस किती दूर?
मला समजत नाही तू गेलीस कशी दूर?
हिऱ्यासारखा प्रकाश तुझा पसरे खूप दूर
तुला कसे रमते इतक्या दूर दूर दूर.


ताऱ्यांनो ताऱ्यांनो तुम्ही कितीजण आहात
असे कसे तुमचे घर दूर दूर आकाशात
पळत पळत तुमच्या पाशी नाही मी पोचत
खेळू, नाचू आनंदाने तुम्ही या माझ्या सोबत.


असे कर.

- तुझ्या मित्रमैत्रिणींबरोबर रात्री तारे मोजण्याचा प्रयत्न कर.
- शिक्षक अथवा मोठ्याकडून सूर्य, चंद्र, तारे यांना असलेली समानार्थी नावे समजून घे.

चित्रात रंग भर.







पाठ 15

आपल्या सभोवताली

H4M1U2

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- स्थानिक परिसराबद्दल माहिती मिळवशील.

खालील चित्रांचे निरीक्षण कर. त्यांची नावे सांग. शिक्षक / वडिलधाऱ्यांची मदत घे.



























खालील चित्रे बघ. त्यापैकी तुझ्या गावाजवळ असल्यास (✓) अशी खूण कर. नसल्यास (✗) अशी खूण कर.

क्र.सं	तुझ्या गावाजवळ	खूण	
1			
2			
3			
4			

5		
6		
7		
8		
9		

तुझ्या गावासभोवती काय काय आहे? शिक्षक अथवा मोठ्यांशी चर्चा कर.

खालील चित्रात रंग भर.



गा आणि आनंद लुटा

येरे दादा येग ताई
आपण गाणे गाऊया ।
परिसरातील गंमत आम्ही
सारे समजून घेऊया ॥

पों ऽ पों ऽ करत बस आली
रस्त्यावर धावू लागली ।
शाळेसमोर थांबली येऊन
गावी निघाली लोक घेऊन ॥

गावाभोवती हिरवे मळे
सर्वांसाठी लहान तळे ।
तळ्याच्या काठी तंबोरे बेडकांचे
पाण्यात बघूया प्रकार माश्यांचे ॥

बाग पेरु नि आंब्याची
त्यावर भरते शाळा पक्ष्यांची ।
कोकीळा गाते सुस्वर गाणं
मोर नाचतो रानात छान ॥

गावाबाहेर करवंदाची जाळी
दूर जंगलात वाघाची डरकळी ।
सारे मिळून घेऊ आण
करु परिसराचे रक्षण छान ॥

तुझ्या गावाजवळच्या ठिकाणांना शिक्षक किंवा मोठ्यांच्या बरोबर भेट दे. निरीक्षण कर व मित्रांना सांग.